Media Coverage – Health Camp by Bharat Forge at Kotamdaar

06 प्रभात पुणे, गुरुवार, दि. ४ मे २०१७

www.eprabhat.net पुणे जिल्हा

कोटमदरा येथे १७५ जणांची तपासणी

शिरोली, दि. ३ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र आरोग्य मंडळ पुणे व पतंजली योगपीठ हरिद्वार संयुक्त विद्यमाने कोळवाडी-कोटमदरा ग्रामपंचायतीच्या सहकार्याने कोटमदरा येथे मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीर घेण्यात आले. या शिबिराचे एकूण १७५ जणांची तपासणी करून मोफत औषधे देण्यात आली. यामध्ये १८८ जणांचे रिपोर्टकरिता ब्लड सॅम्पल व रिपोर्टमध्ये ज्यांची जास्तीच्या प्रमाणात रिपोर्टमध्ये गडबड आढळली त्यांना औषधे देण्यात आली. यावेळी आंबेगाव तालुका पंचायत समितीचे उपसभापती नंदकुमार सोमवंशी मार्गदर्शन करताना म्हणाले की, ग्रामस्थांनी ग्रामस्वच्छता याबाबत जागरूक असले पाहिजे. यावेळी मार्गदर्शन केले.

शिबिरात सहभागी १३ डॉक्टरांचे पथक उपस्थित होते. त्यामध्ये ९ स्त्रीरोग एम. डी. तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश होता. शिबिरासाठी ग्रामपंचायत कोळवाडी-कोटमदराचे सरपंच सुनीता गोपाळ कानडे, उपसरपंच अशोक पाचंगे, ग्रामसेवक सुनील पोखरकर, माजी सरपंच बाळासाहेब जिजाबा पडवळ, अंकुश पाचंगे, अनंत पडवळ, अनिल हांडे, तानाजी कानडे, शंकरशेठ पोखरकर, राजेंद्र पडवळ यांनी सहकार्य केले.